| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | पुणे शहर वाहतूक पोलीस<br>PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ५९ /२०२५ दिनांक :-०४/०१/२०२५

## प्रेसनोट

दिनांक ०५/०१/२०२५ रोजी, सकाळी १०/०० वा दरम्यान अखंड मराठा समाज महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांचे वतिने सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख व स्वर्गीय सोमनाथ सुर्यवंशी यांच्या झालेल्या निर्घुण हत्येच्या निषेधार्थ **लाल महल - फडके हौद चौक - दारुवाला पुल - खडीचे मैदान - १५ ऑगस्ट चौक - भारत पेट्रोल पंप - नरपतगिरी चौक - जुने जिल्हा परिषद कार्यालय गेट –जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे असा** जन-आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे शिवाजी रोड, नेहरु रोड व गणेश रोडवर नागरीकांची मोठया प्रमाणावर गर्दी होणार आहे.

त्यामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे, त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, डॉ. संदीप भाजीभाकरे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, फरासखाना वाहतूक विभागाचे हद्दीतील वाहतूकीसंदर्भात तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

### फरासखाना, समर्थ व बंडगार्डन वाहतुक विभाग पुणे अंतर्गत

**दिनांक- ०५/०१/२०२५ रोजी सकाळी ०९.०० वाजेपासून मोर्चा संपेपर्यंत वाहतूकीमध्ये आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.**

१. फरासखाना वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रात शिवाजीरोड व गणेश रोड वरील सर्व प्रकारची मोठी वाहने, बसेस व सर्व प्रकारची चारचाकी वाहनांना प्रवेश बंद राहील.
२. समर्थ वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रात नेहरु रोड वरील सर्व प्रकारची मोठी वाहने, बसेस व सर्व प्रकारची चारचाकी वाहनांना प्रवेश बंद राहील.

**पर्यायी मार्ग :-**

१) शिवाजी रोड वरुन स्वारगेटला जाणारे वाहने स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने खंडोजीबाबा चौक टिळक चौक – टिळक रोडने इच्छितस्थळी जातील.
२) स.गो.बर्वे चौकातून पुणे मनपा भवनकडे जाणारे वाहने स.गो.बर्वे चौकातून जंगली महाराज रोडने – झाशी राणी चौक डावीकडे वळून इच्छितस्थळी जातील.
३) दारुवाला पुल वरुन जिजामाता चौकाकडे येणाऱ्या वाहनांनी पर्यायी मार्गाने इच्छितस्थळी जातील.
४) सेव्हल लव्ह चौकाकडून येणारी वाहतुक मालधक्का चौकाकडे जाणारी वाहने पावर हाऊस चौकाकडून बॅनर्जी चौकाकडे वळून इच्छितस्थळी जातील.

५) मालधक्का चौकाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येणारी वाहतुक बोल्हाई चौकातून डावीकडे वळवून साधू वासवाणी चौकाकडे जाऊन इच्छितस्थळी जातील.

६) डॉ. बाबासाहेब आंबडेकर पुतळा कॅम्प लाल देऊळ मार्गे बॅनर्जी चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येणारी वाहतूक बॅनर्जी चौकातून डावीकडे वळून समर्थ पोलीस स्टेशन मार्गे पावर हाऊस चौकातून इच्छितस्थळी जातील.

४/१

**(डॉ. संदीप भाजीभाकरे)**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय,
वाहतूक शाखा अति. कार्यभार, पुणे शहर

**प्रति,**

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :-**

१) **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १, २, ३, ४** पुणे शहर.
२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) **प्रभारी अधिकारी फरासखाना, समर्थ, स्वारगेट बंडगार्डन** वाहतुक विभाग, पुणे शहर.